**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या**

**दिनांक : २४/०८/२०१२ रोजी सायंकाळी ३.३० वाजता**

**आयोजित केलेल्या २४३ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

**बाब क्रमांक : २४३/२**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करणेबाबत.**

**----------------------------**

**ठराव क्रमांक : ६५६८** **दिनांक : २७/०६/२०१२**

एकमताने असा निर्णय घेण्यात आला कीं, सन २०११-१२ या वित्तीय वर्षाचा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा वार्षिक लेखा एकमताने स्विकृत करण्यात येत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक :  २४३/५**

**विषय :- उस्मानाबाद येथील भूखंड क्रमांक आर-२,**
**एम.आय.डी.सी. या जमिनीवरील ८४ गाळे**
**अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाची**
**निविदा स्विकृती करण्याबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५६९** **दिनांक :  २४/०८/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, उस्मानाबाद येथील भूखंड क्रमांक आर-२, एम.आय.डी.सी. या जमिनीवरील ८४ गाळे अल्प उत्पन्न गट गृहनिर्माध योजनेच्या बांधकामाची मे.विक्रम इन्फ्रास्ट्रक्चर, पुणे यांची १.००  टक्के कमी दराची रु. ४,३९,१२,६८८.४९ च्या निम्नतम निविदेस प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४३/६**

**विषय :- मे.ए.व्ही.शाह आणि कंपनी, सनदी लेखापाल ( मुल्य वर्धित कर व सेवाकर सल्लागार ) यांचे नेमणूकीचे नुतनीकरणा बाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५७०** **दिनांक : २४/०८/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, मे. ए.व्ही. शाह आणि कंपनी, सनदी लेखापाल ( मूल्य वर्धित कर व सेवाकर सल्लगार ) यांची सन २०१२-१३ या एका वर्षाकरिता रु. ८०,०००/- ( रु. ऐंशी हजार फक्त ) प्रतिमहीना फी देऊन म्हाडाच्या कामांकरिता पुनर्नेमणूक करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ लागू करावी.

**बाब क्रमांक : २४३/७**

**विषय :- साईट क्र.१३४, नविन चंद्रपूर येथील १८० गाळे अल्प उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

**----------------------**

**ठराव क्रमांक : ६५७१** **दिनांक : २४/०८/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

१. नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नवीन चंद्रपूर येथिल साईट क्र.१३४ वर १८० एल.आय.जी. गाळयांच्या योजनेच्या बांधकामाकरिता ( रुपये ८,२३,३१,७९१/- या निविदा रकमेवर ) प्राप्त झालेल्या निविदा देकारापैकी निम्नत्तम देकार देणा-या इंदरदिप कन्स्ट्रक्शन कंपनीचा वाटाघाटीने ४.८६% ने जास्त असलेला तथा रु. ८,६३,३३,११६/- चा देकार प्राधिकरणाला प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार स्विकारण्यांत येत आहे.

२. योजनेतील गाळयांचे बांधकाम तथा कामाचे कार्यादेश गाळयांच्या निश्चित मागणीला अनुसरुन देण्यांत यावेत. मागणीनुसार द्यावयाच्या कार्यादेशाच्या पध्दतीसाठी कंत्राटदाराला कोणतीही जादा आकारणी अथवा कोणत्याही सबबीखाली अतिरिक्त मोबदला अनुज्ञेय राहणार नाही जसे कीं, योजनेतील एकूण गाळयांची संख्या कमी असल्यास व जेवढी मागणी प्राप्त झाली आहे तेवढया मागणीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यामुळे कमी होणार`परिमाण आणि खर्च या कारणामुळे व अन्य कोणत्याही सबबीमुळे मोबदला अनुज्ञेय राहणार नाही.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४३/८**

**विषय :- धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर-५ चा पुनर्विकास करण्यासाठी प्रकल्प समन्वयक व संनियंत्रकाची ( PMC ) नेमणूक करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा स्विकृतीबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६५७२** **दिनांक : २४/०८/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, विषयांकित देकारांबाबत प्राधिकरणापुढे विशद केलेली बाब आणि प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, प्राप्त झालेले देकार स्विकारार्ह नाहीत. यास्तव, सदरहू कामासाठी पीएमसी नेमण्याची प्रक्रीया नव्याने / निविदा मागवून पुन्हा सुरु करण्यात यावी. निविदा मागविताना त्यामध्ये कोणत्याही पध्दतीच्या त्रुटी राहणार नाहीत व पीएमसीकडून अपेक्षित असलेले कार्य स्वयंस्पष्ट पध्दतीने नमूद करण्याची काळजी निविदा मुल्यमापन समिती ( तांत्रिक छाननी ) यांनी घ्यावी.

प्राप्त झालेले दोन्ही देकार फेटाळयाचा निर्णय प्राधिकरण घेत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४३/९**

**विषय :- धारावी पुनर्वसन प्रकल्पातील म्हाडामार्फत करावयाच्या सेक्टर-५ च्या म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावर बांधावयाच्या पुनर्वसन इमारतीच्या निविदा स्विकृतीबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५७३** **दिनांक : २४/०८/२०१२**

१) मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी धारावी येथील सेक्टर-५ मधील, म्हाडाच्या भूअभिन्यासातील ३२१०.०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर धारावी, सेक्टर-५ मधील असलेल्या पात्र झोपडपट्टी धारकांसाठी प्रत्येकी ३०० चौ.फूट चटई क्षेत्रफळाच्या अंदाजे ३४४ सदनिका बांधण्याची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला होता. सदर निविदा दोन वेळा मागविण्यात आली होती.

पहिल्यावेळी मागविण्यात आलेल्या निविदेस निविदा भरण्यासाठी दोनदा मुदतवाढ देऊनही पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर निविदा रद्द करण्यात आली व दुस-यावेळी नव्याने निविदा मागविण्यात आली. सदर निविदेमध्ये ३४४ सदनिकांच्या बांधकामासाठी अंदाजे रु.३८,४४,४०,३१०/- (१९५२/- प्रति चौ.फूट) व प्रस्तावित इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ १,९६,९५०.०० चौ.फूट इतके नमूद करण्यात आले होते. तथापि, धारावी पुनर्विकास प्राधिकरणाच्या मंजुरीनुसार ३५६ सदनिका आहेत. निविदेमध्ये नमूद केल्यानुसार संभावित (Prospective) निविदाकार यांनी आपली बोली ठोक कंत्राट पध्दतीप्रमाणे (Lump sum Turn Key) बांधकाम क्षेत्रावर प्रति चौ.फूट देणे अपेक्षित आहे. सदर दुस-या निविदेस ८ निविदाकारांनी प्रतिसाद दिला, परंतु त्यापैकी फक्त ३ निविदाकारांनी प्रत्यक्षात निविदा सादर केल्या आहेत. तिन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा दि.२३.०७.२०१२ रोजी उघडण्यात आल्या. निविदा सादर करणा-या निविदाकारांमध्ये (१) मे.बी.जी.शिर्के क.टे.प्रा.लि. (२) मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लि. व (३) मे.युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांचा समावेश आहे. तांत्रिक निविदांची छाननी केली असता मे.बी.जी.शिर्के क.टे.प्रा.लि. हे एकच ठेकेदार तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेले आहेत.

सदर योजनेच्या बांधकामाकरिता मे.बी.जी. शिर्के यांनी रू.२४३९/- प्रति चौ.फूट बांधकाम क्षेत्र असा देकार दिला आहे. सदरचे काम निविदेप्रमाणे पारंपारिक पध्दतीने करणे अपेक्षित आहे. पण निविदाकाराने हे काम पूर्वरचित बांधकाम पध्दतीने करण्याचा पर्याय दिला आहे. सदर पर्यायावर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. पूर्वरचित बांधकाम पध्दतीने प्राप्त होणा-या कामाची गुणवत्ता, कामाचा वेग व अति उंच इमारतीसाठी लागणारा नमुना आराखडा (Modular design) तसेच सदर काम करण्याकरिता उपलब्ध होणा-या अपु-या जागेमध्ये काम करण्याची क्षमता या बाबींवर पूर्वरचित बांधकाम पध्दतीने काम करणे हे पारंपारिक पध्दतीने काम करण्यापेक्षा जास्त उपयोगी असल्याने सदर काम पूर्वरचित बांधकाम पध्दतीने करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. सदर पर्यायाची वित्तिय व इतर तपासणी करून सदर पर्यायाबाबत व निविदा स्विकृतीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

२) विषयांकित प्रकल्पासाठी लागणारा खर्च प्राधिकरण निधी लेखाशिर्ष १६० अंतर्गत भागविण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.